**दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, सांगोला यांचे न्यायालयात**

**नियमित दिवाणी मुकदमा नं. ४५३/२०२३**

**निशाणी २५ लगत आदेश**

**( शोभा विरुध्द बाळासाहेब व इतर)**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांचे विरुध्द पारीत झालेला विना कैफियत चौकशी आदेश रद्द करणेसाठी व कैफियत देण्यास झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी यांनी अर्जात असे कथन केले आहे की, वादीने प्रतिवादी विरुध्द अग्रहक्क बाजवून मिळणेसाठी तसेच वाटप व निरंतर ताकीद मिळणेसाठी अर्ज केला आहे. प्रतिवादी क्र. १ दाव्यामध्ये दि. १०/११/०२३ रोजी हजर झाले, परंतु त्यांना वेळेत कैफियत देता आले नाही. त्यामुळे दि. १३/२/२०२४ रोजी त्यांचे विरुध्द विना कैफियत चौकशी आदेश पारीत करण्यात आला आहे. प्रतिवादी यांना वेळेत कागदपत्रे मिळाली नसल्याने त्यांना कैफियत देता आली नाही. सदरचा आदेश रद्द होणे आवश्यक आहे. सदरचा आदेश रद्द न झाल्यास प्रतिवादी यांचे अपरीमित नुकसान होणार आहे. सबब, प्रतिवादी यांनी त्यांचे विरुध्द पारीत झालेला विना कैफियत चौकशी आदेश रद्द करणेत यावा तसेच कैफियत देण्यास झालेला विलंब माफ करणेत यावा अशी विनंती केली आहे.

३. वादी यांनी नि. ३१ वरती त्यांचे म्हणणे दिले आहे व प्रतिवादींचा अर्ज नाकारला आहे. प्रतिवादी यांनी कारण नमुद केले नाही. अर्जात नमुद कारण खोटे आहे.

वादीस त्रास देण्यासाठी अर्ज केला आहे. अर्जासोबत पुरावा दिलेला नाही. त्यामुळे प्रतिवादीचा अर्ज नामंजूर करणेत यावा. अर्ज मंजूर करावयाचा झालेस जास्तीत जास्त खर्च देण्याचा आदेश व्हावा अशी विनंती केली आहे.

४. पुढील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित होतात. त्यांचेवरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह नोंदवत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे काय ? | होकारार्थी |
| २. | आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्र. १ बाबत –**

५. प्रस्तुतचा अर्ज, वादी व प्रतिवादीचे वकीलांचे म्हणणे व दोन्ही पक्षातर्फे युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी यांनी त्यांच्या विरुध्द झालेला विना लेखी कैफियतचा आदेश रद्द करुन मागितला आहे. वादीच्या वकीलांनी म्हणणे दाखल करुन आक्षेप असल्याचे नमुद केले आहे.

६. प्रतिवादीतर्फे अर्जात नमुद केलेली कारण संयुक्तिक वाटत असल्या कारणाने तसेच नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार दोन्ही पक्षकारांना त्यांची बाजू मांडण्याची पुरेपुर संधी देण्यात यावी. जर प्रतिवादी त्याच्या लेखी कैफियतीशिवाय प्रकरण चालले तर त्याच्या

हक्कास बाधा पोहचू शकते. याउलट प्रतिवादी यांना लेखी कैफियत दाखल करण्याची संधी दिली तर वादीचे अतोनात नुकसान होणार नाही. म्हणून प्रतिवादींचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. करीता मी मुद्दा क्र. १ यास होकारार्थी उत्तर नोंदवित आहे.

मुद्दा क्र २ करीता –

७. मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदविल्याने प्रतिवादीचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. करीता मुद्दा क्र. २ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज प्रतिवादी क्र. १ यांनी **रु. १०००/–** दंड देण्याचे अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी दंडाचे रकमेपैकी रु. ५००/– न्यायालयात शासन नावे जमा करावेत व उर्वरित रु. ५००/– वादी यांना अदा करावेत.

३. सदर आदेशाची पुर्तता केलेवर प्रतिवादी यांचे विरुध्द पारीत झालेला विना कैफियत चौकशी आदेश रद्द करणेत येतो व विलंब माफ करणेत येतो.

SANJAY MOTIRAM GHUGE
Digitally signed by SANJAY MOTIRAM GHUGE
Date: 2024.10.19 17:40:12 +0530

सांगोला. (श्री. संजय मो. घुगे)
दिनांक – १९/१०/२०२४. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | A. A. Chavan |
| (b) | Court | : | Shri Sanjay M. Ghuge, Civil Judge, J.D.& J.M.F.C., Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 19/10/2024 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 21/10/2024 |